# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला टाळे!

## अपेक्षित विकास झाला नसल्याचा महानगर नियोजन समितीचा आरोप

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पुणे महानगराच्या नियोजन आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मागील १० ते १२ वर्षांत अपेक्षित प्रगती झालेली नाही. विकास आराखडा, रस्ते, पाणी आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) टाळे ठोकण्याची वेळ आली आहे, अशी टीका महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंत भोसले यांनी केली.**



याबाबत पत्रकार परिषदेत बोलताना भोसले यांनी पीएमआरडीएच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पुण्याच्या विकासासाठी सर्वच पातळ्यांवर पीएमआरडीए अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी नागरी हक्क संघर्ष समितीचे सुधीर कुलकर्णी आणि ॲड. उमेश तारे उपस्थित होते.

चाकण, हिंजवडी परिसरातील कोंडी तसेच पायाभूत सुविधांच्या प्रश्नांसाठी उद्योगांकडून आंदोलने करण्यात आली. मात्र, या प्रश्नांवर अद्याप ठोस तोडगा निघालेला नसल्याचे भोसले यांनी सांगितले. नियोजनाच्या प्रक्रियेत गरजेच्या निकषांचा विचार करून पुढील कार्यवाही करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

पीएमआरडीएच्या आराखड्यासह स्ट्रक्चरल प्लॅनबाबत पुणे महानगर नियोजन समितीने न्यायालयात धाव घेतली आहे. याचिकेवर न्यायालयाने स्पष्टीकरण मागितले असल्याचे सांगण्यात आले. पीएमआरडीएकडून वारंवार कर्तव्यात कसूर होत असून विकासकामांमध्येही अपेक्षित यश मिळालेले नाही, असा आरोप समितीने केला. त्यामुळे पीएमआरडीएचा विशेष नियोजन प्राधिकरणाचा (SPA) दर्जा तसेच स्ट्रक्चरल प्लॅनचे अधिकार काढून घेण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. बांधकाम परवानग्या आणि विकास आराखड्याबाबत नगररचना विभागाने योग्य भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, पीएमआरडीएच्या कामकाजातील त्रुटी, विकासकामांतील दिरंगाई आणि संबंधित नियम-जवाबदाऱ्यांची पूर्तता याबाबतही समितीने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

> "पुणे महानगराच्या नियोजन आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी पीएमआरडीएची स्थापना करण्यात आली. मात्र, गेल्या १० ते १२ वर्षांत अपेक्षित विकास झालेला नाही. डीपी, टीपी स्कीम, रस्ते, पाणी आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवरही ठोस काम झालेले दिसत नाही. पुण्याच्या विकासासाठी सर्वच पातळ्यांवर पीएमआरडीए अपयशी ठरले आहे. चाकण आणि हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडी तसेच पायाभूत सुविधांच्या प्रश्नांसाठी उद्योजकांना आंदोलन करावे लागते, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे पीएमआरडीएच्या कार्यपद्धतीचा फेरविचार करून गरजेच्या निकषांचा विचार करीत पुढील प्रक्रिया राबवावी. सध्याची परिस्थिती पाहता पीएमआरडीएला टाळे ठोकण्याची वेळ आली आहे."
>
> **- वसंत भोसले, सदस्य, महानगर नियोजन समिती.**

## बधे महाविद्यालयाचा अभिनव 'पुस्तक दहीहंडी' उपक्रम; वाचनसंस्कृतीला उत्सवाची जोड

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**दहीहंडीच्या पारंपरिक उत्सवाला वाचनसंस्कृतीची अनोखी जोड देत माऊली प्रतिष्ठान संचालित श्रीमती कलावती बधे कला व वाणिज्य महाविद्यालय, कोंढवा बुद्रुक येथे 'पुस्तक दहीहंडी' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, आणि विविध साहित्यप्रकार विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.**






> "आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांचा पुस्तकांशी संवाद कमी होत चालला आहे. त्यामुळे दहीहंडीसारख्या पारंपरिक उत्सवाला वाचनसंस्कृतीची जोड देण्याचा प्रयत्न आम्ही केला. 'पुस्तक दहीहंडी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी उत्सवाचा आनंद घेतानाच आपल्या आवडीची पुस्तके घरी नेली, हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती आहे. विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाची गोडी निर्माण करून ज्ञानाची ही परंपरा अधिक समृद्ध करणे, हा आमचा उद्देश आहे."
>
> **- प्रा. प्रमोद धिवार, प्राचार्य, श्रीमती कलावती बधे कला व वाणिज्य महाविद्यालय.**

दहीहंडी हा केवळ उत्सव आणि जल्लोष न राहता त्यातून ज्ञान, वाचन आणि संस्कारांचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा, या संकल्पनेतून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद धिवार यांच्या संकल्पनेतून 'पुस्तक दहीहंडी' साकारण्यात आली. पारंपरिक दही किंवा लोण्याऐवजी या दहीहंडीमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारची पुस्तके आकर्षक पद्धतीने सजविण्यात आली होती.

या दहीहंडीमध्ये कथा, कादंबऱ्या, महापुरुषांची चरित्रे, नाटके, कविता तसेच विविध विषयांवरील पुस्तकांचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी उत्साहाने दहीहंडी फोडल्यानंतर आपापल्या आवडीची पुस्तके निवडून ती घरी नेली. विशेष म्हणजे ही सर्व पुस्तके महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना भेट म्हणून देण्यात आली. त्यामुळे उत्सवाच्या आनंदासोबत विद्यार्थ्यांना ज्ञानाची अनमोल भेट मिळाली.

'दहीहंडी एक निमित्त, पुस्तकांशी मैत्री हा खरा हेतू' या संकल्पनेतून आयोजित केलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोबाईल आणि डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे वाचनाची सवय कमी होत असताना विद्यार्थ्यांना पुन्हा पुस्तकांकडे वळविण्यासाठी अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. प्रतीक्षा मंडोळे, प्रा. ज्योती अंकम, प्रा. रोहिणी माने तसेच कार्यालयीन अधीक्षक सौ. स्वरांजली भालेराव यांनी केले.

महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमाचे माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक श्री. संदीप (नाना) मारुती बधे तसेच माऊली प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ॲड. सौ. प्रितीताई संदीप बधे यांनी कौतुक केले. तसेच प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या 'पुस्तक दहीहंडी'मध्ये सीमा वाघमारे, अंजली गव्हाणे, मुस्कान पठाण, रणवीर अहिवळे, शुभम पठारे, आकांक्षा आदनकर, श्रुती हौसारे, आस्मा मुलानी, शीतल जाधव, ओंकार तारु, अभिजीत सुतार, ओंकार शिंदे आणि मानसी पठारे या विद्यार्थी प्रतिनिधींनी उत्साहाने सहभाग घेतला.